# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक ०२.१०.२०२६ शुक्रवार**

**कुख्यात गुंड स्थानबध्द :–**

नागपूर शहराचे पोलीस आयुक्त यांनी दिनांक ०१.१०.२०२६ रोजी जारी केलेल्या आदेशान्वये पोलीस ठाणे इमामवाडा, नागपूर चे हद्दीत शरीराविरूध्द व मालमत्तेविरूध्द गुन्हे करणारा कुख्यात गुंड नामे मयुर वल्द सुरेश फुले, वय २९ वर्षे, रा. रामबाग, मिलींद बौध्द विहारजवळ, पोलीस ठाणे इमामवाडा, नागपूर शहर यास महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले, औषधी द्रव्य विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, व्हीडीयो पायरेटस्, वाळु तस्कर आणि अत्यावश्यक वस्तुंचा काळा बाजार करणारे, बेकायदेशिर जुगार, बेकायदेशिर लॉटरी चालविण्याचा आणि मानवी अपव्यापार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालणे संबंधी अधिनियम, १९८१ अंतर्गत दिनांक ०१.१०.२०२६ रोजी स्थानबध्द आदेश पारीत केला. त्यास दि. ०१.१०.२०२६ रोजी आदेशाची बजावणी करून येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथे ठेवण्यात आले आहे.

मयुर वल्द सुरेश फुले याचेविरूध्द पोलीस ठाणे इमामवाडा येथे गैरकायदयाची मंडळी जमवुन खुन करण्याचा प्रयत्न करणे, जबरी चोरी करतांना आपखुशीने दुखापत करणे, गैरनिरोध करणे, हमला किंवा फौजदारी पात्र बलप्रयोग करणे, प्राणघातक शस्त्राने आपखुशीने गंभीर दुखापत करणे, प्राणघातक शस्त्राने आपखुशीने दुखापत करणे, शांतता भंग करण्याचे उद्देशाने जाणीवपुर्वक अपमान करणे, दुखापत, हमला किंवा गैरनिरोध करण्याची पूर्व तयारी करून नंतर रात्रीच्या वेळी चोरटे गृहअतिक्रमण करणे, मालमत्तेचे नुकसान करणे, अपराधीक जिवे ठार मारण्याची धमकी देणे, अश्लिल भाषेत शिवीगाळ करणे, प्राणघातक शस्त्र जवळ बाळगणे, मनाई आदेशाचे उल्लघंन करणे, इत्यादी मालमत्ता आणि शरीराविरूध्दचे गंभीर स्वरूपाचे अनेक गुन्हे दाखल आहेत.

सदर स्थानबध्द इसमाविरूध्द पोलीस ठाणे इमामवाडा अंतर्गत सन २०२० मध्ये कलम ११० (ई)(ग) सीआरपीसी नुसार प्रतिबंध कारवाई करण्यात आली होती. त्यानंतर सन २०२१ मध्ये पोलीस उप आयुक्त परि. क्र. ४ नागपूर शहर यांचे हद्दपार आदेशान्वये ०६ महिण्याकरिता हद्दपार करण्यात आले होते, त्यानंतर सन २०२१ मध्ये कलम ११० (ई)(ग) सीआरपीसी नुसार प्रतिबंध कारवाई करण्यात आली होती. परंतु त्याने आपली गुन्हेगारी प्रवृत्ती सुरूच ठेवल्याने सन २०२२ मध्ये एमपीडीए कायदयांतर्गत अन्वये ०१ वर्षाकरिता स्थानबध्द करण्यात आले होते. त्यानंतर सन २०२३ मध्ये कलम ११०(ई)(ग) सीआरपीसी अन्वये प्रतिबंधक करवाई करण्यात आली होती. परंतु त्याने आपली गुन्हेगारी प्रवृत्ती सुरूच ठेवल्याने सन २०२४ मध्ये एमपीडीए कायदयांतर्गत अन्वये ०१ वर्षाकरिता स्थानबध्द करण्यात आले होते. त्यानंतर स्थानबध्दतेचा ०१ वर्षाचा कालावधी पुर्ण करून सुटुन आल्यानंतर त्याने पुन्हा गुन्हे करणे सुरूच ठेवल्याने सन २०२५ मध्ये कलम १२९(ई)(ग) बी.एन.एस.एस. अन्वये प्रतिबंधक करवाई करण्यात आली होती. त्याचेकडुन ०२ वर्षाकरता अंतिम बंधपत्र घेण्यात येऊन बंधपत्रातील अटी व शर्तीचे उल्लंघन केल्याने बंधपत्रातील रककम सरकार जमा करण्यात आली होती. परंतु त्याचेवर केलेल्या प्रतिबंधक कारवाईचा कोणताही परिणाम झाला नाही. सदर बंधपत्राचे उल्लंघन करून सदर इसमाने पोलीस ठाणे इमामवाडा हद्दीत जबरी चोरी करतांना आपखुशीने दुखापत करणे, गैरनिरोध करणे,

प्राणघातक शस्त्राने आपखुशीने दुखापत करणे, हमला किंवा फौजदारी पात्र बलप्रयोग करणे, आपखुशीने दुखापत करणे, गैरकायदयाची मंडळी जमवुन दंगा करणे, अश्लिल भाषेत शिवीगाळ करणे, शांतता भंग करण्याच्या उद्देशाने जाणीवपुर्वक अपमान करणे, जीवे ठार मारण्याची धमकी देणे इत्यादी अशा स्वरूपाचे गुन्हे केलेले आहेत.

अशाप्रकारे धोकादायक व्यक्ती नामे मयुर वल्द सुरेश फुले याची अपराधीक कृत्ये निरंतर वाढत असल्याने आणि त्यामुळे सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण होत असल्याने वरिष्ठ पोलीस निरिक्षक, पोलीस ठाणे इमामवाडा, नागपूर शहर यांनी नमुद आरोपीतास स्थानबध्द करण्याकरिता गुन्हे शाखेस प्रस्ताव सादर केला होता. गुन्हेशाखेतील एम.पी.डी.ए. विभागाने नमुद आरोपीला स्थानबध्द करण्याकरीता प्रस्ताव सादर केला. त्याअन्वये स्थानबध्द प्राधिकारी मा. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे समक्ष सादर केले असता त्यांनी वर नमुद स्थानबध्द इसमाविरूध्द स्थानबध्दतेचा आदेश पारित करून त्यास येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथे ठेवण्याबाबत आदेश दिलेत. त्याअन्वये वर नमुद इसमाविरूध्द स्थानबध्दतेची महत्वपुर्ण कारवाई करून त्यास येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथे ठेवण्यात आले आहे.

**(कामगिरी)**

**१) पाचपावली पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरी करणाऱ्या सराईत चोरास अटक.**

दिनांक २९.०८.२०२६ चे ११.३० वा. ते १९.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे पाचपावली हद्दीत आवळे नगर, टेकानाका, राहुल बुध्दविहारजवळ, सरला ढोके यांचे घरी किरायाने राहणारे फिर्यादी नितीन भारत रंगारी, वय ३९ वर्षे यांनी त्यांची होंडा ॲक्टिवा ६ जी मोपेड क्र. एम.एच. ४९ बी.पी ३२७४ किंमती ३०,०००/—रू. ची ही टेका नाका जवळील जॉली देशी दारुचे दुकानासमोर लॉक व पार्क करून दुकानात गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद गाडी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पाचपावली येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे तपासादरम्यान, पाचपावली पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपी जिशान अब्दुल हफीज शेख, वय २५ वर्ष, रा. आसीनगर, गौसिया मस्जिद जवळ, पाचपावली, नागपूर यास ताब्यात घेऊन विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन १) होंडा ॲक्टिवा ६ जी मोपेड क्र. एम. एच. ४९ बीपी ३२७४ २) होंडा ॲक्टिवा मोपेड क्र. एम.एच. ३१ ईएल १८४२ तसेच, गुन्हयात वापरलेली पांढरे रंगाची (काळा रंग दिलेली) ३) टाटा इंडीका कार क्र. एम.एच. १२ एन.एक्स ०५८० असा एकुण ३,०५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी हा नमुद पांढरे रंगाचे कारने चोरी करीत असे व चोरी केल्यानंतर कार ला काळा रंग देत असे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राहुल मदने, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ३), मा. श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग), वपोनि. विवेक पडधान यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि. सचिन भोंडे, पोहवा पवन भटकर, राजेश कोकाटे, पोअं. ओमप्रकाश बुरडे, शंकर आगळे व मनोज चौधरी यांनी केली.



**<u>२) कळमणा पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरीचा गुन्हा उघडकीस.</u>**

दिनांक २८.०९.२०२६ चे १८.१० वा. चे दरम्यान, फिर्यादी मुन्नालाल रमचरी वर्मा, वय ४४ वर्षे, रा. प्लॉट क्र. १४, मंगलमुर्ती सोसायटी, भरतवाडा रोड, कळमणा, नागपूर यांनी त्यांची हिरो एचएफ डिलक्स गाडी क्र. एम.एच. ४९ बी.एल १३८३ किंमती २५,०००/—रू. ची ही पोलीस ठाणे कळमणा हद्दीतील शुक्ला लॉनजवळ उभी करून, लघुशंकेकरीता रोडचे कडेला गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद गाडी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कोतवाली येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान, कळमणा पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपीस निष्पन्न करुन आणि त्याचा शोध घेऊन, आरोपी नामे दशरथ उर्फ लक्की बुदधुलाल साखरे, वय २२ वर्षे, रा. विजयनगर, कळमणा, नागपूर, ह.मु. — बडा ताजबाग, ताजी पार्क, गाल्डन गल्ली, सक्करदरा, नागपुर यास ताब्यात घेतले. आरोपीस गुन्हे संबंधाने विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. त्याचे ताब्यातुन चोरी केलेले वाहन जप्त करण्यात आले आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमणा विभाग), वपोनि. प्रविण काळे यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. करीम पठान व त्यांचे तपास  पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



**<u>३) एमआयडीसी पोलीसांची कामगिरी :— वेगवेगळे पोलीस ठाणे येथे दाखल गुन्ह्यात पाहिजे आरोपीस अटक.</u>**

दिनांक ०२.१०.२०२६ चे १४.१० वा. चे सुमारास, एमआयडीसी पोलीसांचे तपास पथकाला खात्रीशीर माहिती मिळाली की, शरीराविरुध्द गुन्हे करणारा तसेच, अनेक गुन्ह्यात पाहिजे असलेला आरोपी हिमांशु जंगले हा पोलीस ठाणे हद्दीतील प्लास्टो कंपनी परिसरात फिरत आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन, परिसरात शोध घेतला असता, प्लास्टो कंपनीचे विरुध्द हिंगणाकडे जाणारे रोडवर मिळालेल्या वर्णनाचा इसम दिसुन आला. त्यास आवाज दिला असता, तो पोलीसांना पाहुन पळुन जाण्याचे तयारीत असता, त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव हिमांशु प्रमोद जंगले वय २३ वर्षे रा. एकात्मता नगर, जयताळा, एमआयडीसी, नागपूर असे सांगीतले. त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, तो पोलीस ठाणे एमआयडीसी येथे दाखल कलम २९६,११५(२),३५२,३५१(३),३२४,३(५),१८९(२),१८९(४),१९१(५),१९१(३), १९० भान्यासं., सहकलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १४२,१३४ म.पो.का. तसेच, पोलीस ठाणे अंबाझरी येथे दाखल कलम १०९(१),१८९(२),१८९(४),१९१(२),१९१(३),६१(२) भा.न्या.सं., सहकलम ४,२५ भा.ह.का., सह कलम १४२,१३४ म.पो.का., पोलीस ठाणे राणा प्रतापनगर येथील कलम ११८(२),१८९(२),१९०,१९१(२),

१९१(३) भा.न्या.सं. या गुन्ह्यात पाहिजे आरोपी असल्याचे दिसुन आले. आरोपीस अटक करण्यात आले आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री. सिंगा रेड्डी ऋषिकेश रेड्डी, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. १), मा. श्री. यशवंत नलावडे, सहा. पोलीस आयुक्त (एमआयडीसी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. बाबुराव राऊत, पोनि. पुरुषोत्तम देवकर, सपोनि. गजानन काठेवाडे, पोउपनि. पंकज सयाम, पोहवा. अभिषेक हरदास, प्रमोद गिरी, प्रमोद सोनोने, प्रविण फलके, विक्रांत देशमुख, पोअं. अंकुश कनोजिया, किरण शेजवळ, किशोर इंगळे व रोमित राऊत यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे वाडी :— शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक ०१.१०.२०२६ चे १९.४५ वा. चे सुमारास, वाडी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, डॉली मोबाईल शॉपचे बाजुला अश्विनी अमृततुल्य दुकानाजवळ, दत्तवाडी येथे पांढरे रंगाचा लायनिंगचा शर्ट व निळ्या रंगाचा जिन्सपॅन्ट घातलेला एक इसम आपले जवळ हत्यार बाळगुन आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम दिसुन आला. त्यास हटकले असता, तो पोलीसांना पाहून पळू लागला. त्याचा पाठलाग करुन त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव मुकेश वसंता हनवते, वय २७ वर्षे, रा. भिमनगर, नवीन झोपडपट्टी, झिरो डिग्रीचे बाजुला, एमआयडीसी, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे आत कंबरेत लपविलेला एक दातेरी लोखंडी चाकु किंमती ५००/—रू. चा मुद्देमाल मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी पोहवा. धर्मेंद्र यादव यांचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे वाडी येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसींग)**

**<u>१) पोलीस ठाणे अजनी</u> :—** फिर्यादी रोहीत गणपत चंद्रागडे, वय २६ वर्षे, रा. शास्त्रीनगर, वार्ड क्र. ५, गडचांदुर ता. कोरपना, जि. चंद्रपुर यांनी पोलीस ठाण अजनी येथे तक्रार दिली की, त्यांचा मामा नामे लक्ष्मण शामसुंदर धोटे, वय ४५ वर्षे, रा. फिर्यादी प्रमाणे हे दारु पिण्याचे सवईचे असुन, त्यांना फिट येण्याचा आजार आहे. दिनांक २६.०९.२०२६ रोजी गडचांदुर बसस्टॉप येथे अचानक त्यांना फिट आल्याने, ते जमीनीवर पडून त्यांचे डोक्याला गंभीर दुखापत झाली. गडचांदुर हॉस्पिटल येथुन सिटी स्कॅनकरीता मेडीकल हॉस्पिटल येथे रेफर केल्याने,

उपचारादरम्यान दिनांक २८.०९.२०२६ चे ०१.०० ते ०४.०० वा. चे दरम्यान मेडीकल हॉस्पिटल येथील एटिएम येथुन ते बेपत्ता झाले आहेत. शोध घेतला असता, मिळून आले नाही. **वर्णन** रंग–सावळा, चेहरा–लांबट, बांधा–सडपातळ, उंची– ५ फुट ३ इंच, केस–काळे लहान, अंगात– लालसर रंगाचा शर्ट व करड्या रंगाचा पॅन्ट व कत्था रंगाची बनियान घातलेली आहे. भाषा–हिंदी/मराठी बोलतात. फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे अजनी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**२) पोलीस ठाणे अजनी :–** फिर्यादी जितेंद्र सिताराम दारवटे, वय ४३ वर्षे, रा. डोमकी कॉम्प्लेक्स, शिवाजी चौक, पारशिवनी, नागपूर यांनी पोलीस ठाण अजनी येथे तक्रार दिली की, त्यांचा भाऊ नामे रामचंद्र सिताराम दरवटे, वय ४३ वर्षे यांना पाईल्सचा त्रास असल्याने ते उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल, वार्ड क्र. ११ येथे दाखल होते. दिनांक २९.०९.२०२६ चे ०३.०० ते ०८.०० वा. चे दरम्यान मेडीकल हॉस्पिटल येथुन बेपत्ता झाले आहेत. शोध घेतला असता, मिळून आले नाही. **वर्णन** रंग–सावळा, चेहरा–गोल, बांधा–सडपातळ, उंची– ५ फुट ५ इंच, केस–काळे पांढरे, अंगात– लाल रंगाची टि–शर्ट व पॅन्ट घातलेली आहे. भाषा–हिंदी/मराठी बोलतात. फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे अजनी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**३) पोलीस ठाणे अजनी :–** फिर्यादी श्रीमती विमला राजाराम राय, वय ५७ वर्षे, रा. घर क्र. २१९/२, शक्ति चौक, दत्तात्रय मंदीर जवळ, ता. जि. छिंदवाडा, मध्यप्रदेश यांनी पोलीस ठाण अजनी येथे तक्रार दिली की, त्यांचा भाऊ नामे राजु कचरु मदने वय ५२ वर्षे रा. फिर्यादी प्रमाणे, हे मानसिक आजारी असुन, दिनांक ३०.०८.२०२६ चे १६.०० वा. ते २२.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे अजनी हद्दीतील जुना बाबुलखेडा येथे राहणारी त्यांचे पत्नीस भेटण्याकरीता आले असता, तेथुन बेपत्ता झाले आहेत. शोध घेतला असता, मिळून आले नाही. **वर्णन** रंग–गोरा, चेहरा–गोल, बांधा–मजबुत, उंची– ५ फुट ६ इंच, केस–डोक्यावर टक्कल पडलेले आहे, अंगात– तपकीरी शर्ट व निळा पॅन्ट घातलेला आहे. भाषा–हिंदी बोलतात. फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे अजनी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.


लक्ष्मण


जितेंद


राजु

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. अति. मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. ६, वर्धा. | ४२३६/२०२३ | कलम १३८ एनआय ॲक्ट. | विजय मधुकर मेश्राम, वय ५८ वर्षे, रा. ट्युलिप अपार्टमेंट, चवथा माळा, फ्लॅट क्र. ४ बी, लक्ष्मीनगर, नागपुर. | १३.१०.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | मा. २०वे सहदिवाणी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०१३०६/ २००८ | कलम १४७, १४८, १४९, ३२४, ४२७ भादंवि. | १) रामलाल रामभगत पांडे, वय ३५ वर्षे, रा. लाहोरी डिलक्स बार, धरमपेठ, नागपुर.<br>२) छोटेलाल श्रीरामदेव तिवारी, वय ५० वर्ष, रा. पांढराबोडी, हिलटॉप, एम. एन. मेश्राम चे घरी किरायाने, अंबाझरी, नागपूर.<br>३) झिमशंकर प्रेमलाल मिश्रा वय ४५ वर्षे, रा. पांढराबोडी, हिलटॉप, सुधीर उईकेचे घरी किरायाने, अंबाझरी, नागपूर. | ०७.१०.२०२६ |

स्वा/—
( अंकुश राठोड )
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.

**प्रसिध्दी पत्रक**

**दिनांक १५/०९/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिर नोटीसीच्या अनुषंगाने मुदतवाढीबाबत..**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालया मार्फत दिनांक १५/०९/२०२६ रोजी जाहिर नोटीस प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिर नोटीसीमध्ये सन २०२६ च्या दिवाळी निमित्त फटाका विक्री करण्यासाठी तात्पुरता फटाका परवाना प्राप्त करू इच्छिणाऱ्या इच्छुकांसाठी विहित नमुन्यातील अर्जाचे फॉर्म दिनांक १६/०९/२०२६ ते दिनांक ३०/०९/२०२६ पर्यंत सबंधित पोलीस उप आयुक्त, परिमंडळ क्र.१, २, ३, ४, ५, व ६ यांच्या कार्यालयातून उपलब्ध करून देण्यात येतील, असे नमुद करण्यात आले होते.

तथापि, इच्छुक अर्जदाराची सोय व अधिकाधिक अर्जदारांना अर्ज करण्याची संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सदर अर्जाचे फॉर्म उपलब्ध करून देण्याची मुदत आता **दिनांक १०/१०/२०२६** पर्यंत वाढविण्यात येत आहे. त्यामुळे सन २०२६ च्या दिवाळी निमित्त फटाका विक्रीसाठी तात्पुरता फटाका परवाना प्राप्त करून इच्छिणाऱ्या इच्छुकांनी दिनांक १०/१०/२०२६ पर्यंत सबंधित पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र.१, २, ३, ४, ५, व ६ यांच्या कार्यालयातून विहित नमुन्यातील अर्जाचे फॉर्म प्राप्त करून घ्यावेत.

अर्जासाबत जाहिर नोटीसीमध्ये नमुद केलेली आवश्यक कागदपत्रे जोडून अर्ज विहित मुदतीत सादर करावा. **दिनांक १०/१०/२०२६ नंतर अर्जाचे फार्म उपलब्ध करून दिले जाणार नाहीत / प्राप्त होणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही**, याची सर्व सबंधितांनी नोंद घ्यावी. तसेच दिनांक १५/०९/२०२६ रोजीच्या जाहिर नोटीसीतील इतर सर्व अटी व शर्ती पूर्वीप्रमाणेच लागु राहतील.

फटाका विक्रेत्यांनी फटाका विक्री व साठवणुकीबाबत शासन, पोलीस विभाग, अग्निशमन विभाग व सबंधित प्राधिकरणांनी घालुन दिलेल्या सर्व सुरक्षा नियमांचे काटेकोरपणे पालन करावे.

**( नविनचंद्र रेड्डी )**
सह पोलीस आयुक्त
नागपूर शहर